**माहितीचा अधिकार म्हणजे काय आणि माहितीच्या अधिकाराखाली माहितीसाठी अर्ज कसा करावा**

## १. माहितीचा अधिकार

माहितीच्या अधिकाराने नागरिकांना सार्वजनिक प्राधिकाऱ्यांकडील माहिती मिळवण्यासाठी आवश्यक असलेले बळ दिलेले आहे. कोणत्याही सरकारी कार्यालय किंवा जेथे सरकार सहभागी आहे अशा कोणत्याही संस्थेच्या जन माहिती अधिकाऱ्याकडे माहितीच्या अधिकाराखालील अर्ज निर्धारित शुल्कासह (सामान्यता हे शुल्क रु. १०/- एवढी रक्कम असते) सादर करून निश्चित, मुद्देसूद आणि शक्यतो पाचशेहून कमी शब्दात माहिती मागता येते.

पीपल्स युनियन फॉर सिविल लिबर्टीज आणि अन्य वि. केंद्र सरकार (दिवाणी अपील क्र १९८८ चे ४२९५) या प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाने माहितीच्या अधिकाराला भारताच्या संविधानाच्या कलम १९ च्या तरतुदीअन्वये प्रदान केलेल्या भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याअंतर्गत मूलभूत हक्क म्हणून जाहीर केलेले आहे. माहितीचा अधिकार कायदा, २००५ च्या प्रस्तावनेत या अधिनियमाची पुढील उद्दिष्टे दिलेली आहेत:-

> *"प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजामध्ये अधिकाधिक पारदर्शकता आणि उत्तरदायित्व निर्माण करण्याच्या दृष्टीने, सार्वजनिक प्राधिकरणांच्या नियंत्रणाखालील माहिती नागरिकांना मिळवता यावी म्हणून, नागरिकांच्या माहिती मिळण्याच्या अधिकाराची व्यवहार्य शासन पद्धत आखून देण्याकरिता, केंद्रीय माहिती आयोग आणि राज्य माहिती आयोग गठित करण्याकरता आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी अधिनियम."*

## २. माहितीचा अधिकार कायद्यानुसार 'माहिती' म्हणजे नक्की काय?

अधिनियमाच्या कलम २ (च) अन्वये माहिती या संज्ञेची व्याख्या पुढीलप्रमाणे करण्यात आलेली आहे:-

> *"माहिती" याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिद्धीपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळवता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो."*

जे अस्तित्वात आहे ती माहिती असते ते येथे लक्षात ठेवावे लागेल. तुमची विचारणा प्रश्नाच्या स्वरुपात मांडू नका.


## ३. माहितीचा अधिकार कायदा, २००५ अन्वये कोण माहिती मागू शकते?

माहितीचा अधिकार कायद्याच्या कलम ३ अन्वये भारताचा कोणताही नागरिक या अधिनियमाखाली माहिती मागू शकतो.

### ४. माहितीच्या अधिकाराखाली अर्ज कसा सादर करावा?

अधिनियमाच्या कलम ६ (१) अन्वये केलेल्या तरतुदीनुसार माहितीच्या अधिकाराखालील अर्ज लेखी किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून सादर करता येईल.

माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करण्याच्या पद्धती




### ४.१ ऑनलाइन

- सध्या लोकशाहीच्या पुढील शाखांसाठी ऑनलाइन अर्ज सादर करण्याचा पर्याय उपलब्ध आहे. या ऑनलाइन पोर्टल्सच्या लिंक्स पुढीलप्रमाणे आहेत:-

| अनु. क्र. | प्राधिकरण | लिंक |
|---|---|---|
| ०१ | भारत सरकार | https://rtionline.gov.in/request/request.php |
| ०२ | दिल्ली केंद्रशासित प्रदेश | https://rtionline.delhi.gov.in/ |
| ०३ | महाराष्ट्र शासन | https://rtionline.maharashtra.gov.in/index-e.php |
| ०४ | उत्तर प्रदेश शासन | https://rtionline.up.gov.in/ |
| ०५ | मध्य प्रदेश शासन | http://rti.mp.gov.in/ |
| ०६ | मा. मध्य प्रदेश उच्च न्यायालय | https://mphc.gov.in/right-information?qt-rti=2#qt-rti |

- ऑनलाइन अर्ज सादर करण्यापूर्वी अर्जाचे पीडीएफ फाईलमध्ये रूपांतर करावे लागते.
- केंद्रीय माहिती आयोगाने नुकत्याच दिलेल्या CIC/DOP&T/C/2018/628739/MOHRD/03274 या निकालात लॉकडाऊन कालावधीत

जन माहिती अधिकाऱ्यांनी जीवित आणि स्वातंत्र्याशी संबंधित मामल्यांसाठी स्वतंत्र ई-मेल ॲड्रेस निर्माण करावा असे आदेश पारित केलेले आहेत.

## ४.२ ऑफलाइन

- माहितीच्या अधिकाराचा अर्ज सोपा, नेटका आणि निश्चित व प्रश्नकेंद्रीत असावा.
- माहिती प्रश्नाच्या स्वरुपात मागू नका. अस्तित्वात असलेले अभिलेख मागवण्याबाबत विचार करावा.
  एखाद्या तक्रारीवर कार्यवाही का झाली नाही ही माहिती हवी असल्यास:-
  तुम्ही माझ्या तक्रारीवर कार्यवाही का केलेली नाही **असे विचारू नका**, त्या ऐवजी माझ्या xx/xx/xxxx या तारखेच्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीचे अभिलेख माला पाठवावेत. कोणतीही कार्यवाही झालेली नसल्यास, *"माझ्या xx/xx/xxxx या तारखेच्या अर्जावर कार्यवाही न करण्याची कारणे कृपया कळवावीत"* **असे लिहावे**.
- माहिती शुल्क पोस्टल ऑर्डरद्वारे, रोखीने  किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून (विभागाकडे त्यासाठी व्यवस्था असल्यास) अदा करत येईल.
- कार्यालयाने माहितीच्या अर्जासाठी दिलेल्या पोचपावती जपून ठेवण्याचे सुनिश्चित करावे.
- तुमचा अर्ज स्पीड पोस्ट किंवा रजिस्टर टपालामार्फत पाठवता येईल. त्यायोगे टपाल पोहोचवण्याच्या परिस्थितीवर लक्ष ठेवता येईल आणि संबंधित खात्याकडे अर्ज पोहोचल्याचा पुरावा देखील तुमच्याकडे उपलब्ध राहील. अर्ज कार्यालयात व्यक्तिशा सादर करणार असल्यास, अर्जाच्या छायाप्रतीवर पोचल्याचा शिक्का संबंधित कार्यालयाकडून घ्यावा.

## ५. अर्ज सादर केल्यानंतरच्या पायऱ्या

- अर्ज सादर केल्यापासून ३० दिवसात उत्तर देणे जन माहिती अधिकाऱ्यासाठी अनिवार्य आहे. संबंधित खात्याकडे अर्ज पाठवलेला असल्यास, पाच दिवसांचा अतिरिक्त कालावधी ग्राह्य धरण्यात येतो.
- असमाधानकारक, अपूर्ण किंवा खोटी अथवा चुकीची माहिती दिल्यास, किंवा माहिती पुरवण्याचे नाकारल्यास, प्रथम अपीलिय प्राधिकाऱ्याकडे अपील करता येते.
- सामान्यता प्रथम अपीलिय प्राधिकारी हा संबंधित खात्यातील सर्वोच्च पदस्थ अधिकारी असतो. माहिती मिळाल्यापासून ३० दिवसाच्या कालावधीत अपील दाखल करावे. अर्ज सादर केल्यापासून ३५ दिवसात माहिती न मिळाल्यास, त्याला माहिती पुरवण्यास दिलेला नकार असे ग्राह्य धरण्यात येते आणि अशा परिस्थितीत जन माहिती अधिकाऱ्याला अर्ज प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या मुदतीत पहिले अपील दाखल करणे अनिवार्य आहे.
- प्रथम अपीलिय प्राधिकाऱ्यासंदर्भातील माहिती अर्जदाराला पुरवणे जन माहिती अधिकाऱ्यास अनिवार्य आहे. त्याने तशी माहिती न पुरवल्यास तुम्ही तुमचे प्रथम अपील प्रथम अपीलिय प्राधिकाऱ्यास संबोधित करून ते जन माहिती अधिकाऱ्याच्या पत्त्याच्या द्वारे दाखल करू शकता. अपील प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांच्या मुदतीत अर्जावर निर्णय घेणे प्रथम अपीलिय प्राधिकाऱ्यासाठी अनिवार्य आहे.

- प्रथम अपीलिय प्राधिकाऱ्याच्या आदेशाबाबत असमाधानी असल्यास, अर्जदार अपीलिय प्राधिकरणाच्या आदेशाच्या प्राप्तीपासून ९० दिवसांच्या मुदतीत द्वितीय अपिलिय प्राधिकाऱ्यापुढे, म्हणजेच अर्ज राज्य शासनाशी संबंधित असल्यास राज्य माहिती आयुक्तापुढे आणि अर्ज केंद्र सरकारशी संबंधित असल्यास केंद्रीय माहिती आयुक्तापुढे त्याविरुद्ध अपील दाखल करू शकतो. प्रथम अपीलिय प्राधिकाऱ्याने आदेश जारी न केल्यास, प्रथम अपील सादर करण्याच्या दिवसापासून १२० दिवसांच्या मुदतीत द्वितीय अपील सादर करणे आवश्यक आहे.
- द्वितीत अपीलाच्या निरस्तीसाठी कालावधी निश्चित करण्यात आलेला नाही.

**६. अपवाद**

गोपनीयता आणि गुप्ततेच्या तत्वांचा सन्मान राखण्यासाठी, राज्याची सुरक्षा अबाधित राखण्यासाठी आणि विशिष्ठ हितसंबंधांच्या रक्षणासाठी माहितीच्या अधिकाराखाली प्रकट न करण्याच्या काही बाबींचे अपवाद करण्यात आलेले आहेत.

केवळ कलम ८(१) आणि कलम ९ या दोन कलमांखालीच माहितीच्या अधिकाराखालील अर्ज अप्रकटनाच्या कारणासाठी फेटाळता येतो. खालील कारणांसाठी माहिती पुरवण्यास प्रतिबंध करण्यासाठी कलम ८(१) अन्वये दहा अपवाद करण्यात आलेले असून कलम ९ अन्वये एक अपवाद करण्यात आलेला आहे.

*"८(१) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असेल तरी, कोणत्याही नागरिकाला पुढील माहिती पुरवण्याचे आबंधन असणार नाही,:-*

*(क) जी माहिती प्रकट केल्याने भारताच्या सार्वभौमत्वाला किंवा एकात्मतेला, राज्याच्या सुरक्षेला, युद्धतंत्रविषयक, वैज्ञानिक किंवा आर्थिक हितसंबंधांना, परकीय राज्यांबरोबरच्या संबंधाना बाधा पोहोचेल किंवा अपराधाला चिथावणी मिळेल, अशी माहिती;*

*(ख) कोणत्याही न्यायालयाने किंवा न्यायाधिकरणाने जी प्रकाशित करण्यास स्पष्टपणे मनाई केली आहे किंवा जी प्रकट केल्यामुळे न्यायालयाचा अवमान होऊ शकेल अशी माहिती;*

*(ग) जी प्रकट केल्याने संसदेच्या किंवा राज्य विधिमंडळाच्या विशेषाधिकाराचा भंग होईल अशी माहिती;*

*(घ) वाणिज्य क्षेत्रातील विश्वासार्हता, व्यावसायिक गुपिते किंवा बौद्धिक संपदा यांचा समावेश असलेली जी माहिती प्रकट करणे व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे, अशी सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री पटली असेल त्या माहिती व्यतिरिक्त, जी प्रकट केल्याने त्रयस्थ पक्षाच्या स्पर्धात्मक स्थानाला हानी पोहोचेल, अशी माहिती;*

*(ङ) जी माहिती प्रकट करणे व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे, अशी सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री पटली असेल त्या माहिती व्यतिरिक्त, एखाद्या व्यक्तीच्या विश्वासाश्रित संबंधामुळे तिला उपलब्ध असणारी माहिती;*

*(च) विदेशी शासनाकडून विश्वासपूर्वक मिळालेली माहिती;*

*(छ) जी प्रकट केल्याने कोणत्याही व्यक्तीच्या जीवितास किंवा शारीरिक सुरक्षिततेस धोका निर्माण होईल अथवा कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी किंवा सुरक्षा प्रयोजनासाठी विश्वासपूर्वक दिलेल्या माहितीचा स्रोत किंवा केलेले सहाय्य ओळखता येईल, अशी माहिती;*

*(ज) ज्या माहितीमुळे अपराध्यांचा तपास करणे किंवा त्यांना अटक करणे किंवा त्यांच्यावर खटला दाखल करणे या प्रक्रियांमध्ये अडथळा येईल, अशी माहिती;*

*(झ) मंत्रिमंडळाची कागदपत्रे, तसेच, मंत्रीपरिषद, सचिव व इतर अधिकारी यांच्या विचारविमर्शाचे अभिलेख:*

*परंतु, मंत्रीपरिषदेचे निर्णय, त्याची कारणे आणि ज्या आधारावर ते निर्णय घेण्यात आले होते ती सामग्री ही, निर्णय घेतल्यानंतर आणि ते प्रकरण पूर्ण झाल्यावर किंवा समाप्त झाल्यावर जाहीर करण्यात येईल:*

*परंतु आणखी असे की, या कलमामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या अपवादांतर्गत असणाऱ्या बाबी प्रकट करण्यात येणार नाहीत;*

*(अ) जी माहिती प्रकट करणे हे व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे अशी, यथास्थिती, केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याची, राज्य जन माहिती अधिकाऱ्याची किंवा अपील प्राधिकाऱ्याची खात्री पातळी असेल, ती खेरीजकरून, जी प्रकट करण्याचा कोणत्याही कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी काहीही संबंध नाही किंवा जी व्यक्तीच्या खाजगी बाबीत आगंतुक हस्तक्षेप करील, अशी माहिती:*

*परंतु, जी माहिती संसदेला किंवा राज्य विधांमंडळाला देण्यास नकार देता येणार नाही, ती माहिती कोणत्याही व्यक्तिला देण्यासही नकार देता येणार नाही.*

*९. एखादी माहिती पुरवण्याच्या विनंतीमुळे जर, राज्याव्यतिरिक्त अन्य एखाद्या कॉपीराईटचे उल्लंघन होत असेल तर, कलम ८ च्या तरतुदींना बाधा येऊ न देता, यथास्थिती, केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्यास, किंवा राज्य जन माहिती अधिकाऱ्यास, अशी माहिती पुरवण्याची विनंती नाकारता येईल."*

**टीप:- माहिती मागण्यासाठी कोणतेही कारण सांगण्याची आवश्यकता नाही. भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याप्रमाणेच माहितीचा अधिकार देखील तुमचं मूलभूत हक्क आहे. त्यापैकि कशासाठीहि तुम्ही कारणे सांगण्याची आवश्यकता नाही.**

**७. माहितीच्या अधिकारातून वगळलेले विभाग आणि खाती**

अधिनियमाच्या कलम २४ नुसार, *"या अधिनियमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट, दुसऱ्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या गुप्तवार्ता व सुरक्षा संघटना यांसारख्या, केंद्र सरकारने स्थापन केलेल्या संघटनांना किंवा अशा संघटनांनी त्या सरकारला सादर केलेल्या कोणत्याही माहितीला, लागू असणार नाही:"*

परंतु, जेथे माहितीच्या अधिकाराखाली माहिती प्रकट करण्यापासून खात्याला वगळण्यात आलेले आहे अशा परिस्थितीत देखील, अधिनियमात पुढील विशिष्ठ अपवाद करण्यात आलेले आहेत:-

*"परंतु, भ्रष्टाचार व मानवी हकांचे उल्लंघन यांच्या आरोपांशी संबंधित माहिती या पोटकलमान्वये वगळण्यात येणार नाही:*

*परंतु आणखी असे की, मागितलेली माहिती ही, मानवी हक्काच्या उल्लंघनाच्या आरोपासंदर्भात असल्यास, ती माहिती केंद्रीय माहिती आयोगाची मान्यता मिळाल्यावर पुरवण्यात येईल, आणि कलम 7 मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अशी माहिती, विनंतीचा अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांच्या आत देण्यात येईल."*

त्यामुळे संपूर्ण बंदी असून देखील, भ्रष्टाचार आणि मानवी हक्कांच्या उल्लंघनाशी संबंधित माहिती माहितीच्या अधिकाराखाली पुरवणे आवश्यक आहे.

अधिनियमाच्या दुसऱ्या अनुसूचीमध्ये या कायद्याच्या प्रभावाखालून वगळण्यात आलेल्या संघटनांची यादी आहे. या संघटना पुढीलप्रमाणे आहेत:-

*१. गुप्तवार्ता केंद्र*
*२. मंत्रिमंडळ सचिवालयाची संशोधन व विश्लेषण शाखा*
*३. महसूल गुप्तवार्ता संचालनालय*
*४. केंद्रीय आर्थिक गुप्तवार्ता विभाग*
*५. अंमलबजावणी संचालनालय*
*६. अंमली औषधिद्रव्य नियंत्रण विभाग*
*७. विमानचालन संशोधन केंद्र*
*८. विशेष सरहद्द दल*
*९. सीमा सुरक्षा दल*
*१०. केंद्रीय राखीव पोलीस दल*
*११. भारत-तिबेट सीमा पोलीस*
*१२. केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल*
*१३. राष्ट्रीय सुरक्षा रक्षक*
*१४. आसाम रायफल*
*१५. सशस्त्र सीमा बल*
*१६. विशेष महासंचालक, आयकर (अन्वेषण)*
*१७. राष्ट्रीय तांत्रिक संशोधन संस्था*
*१८. वित्तीय गुप्तवार्ता विभाग, भारत*
*१९. विशेष संरक्षण पथक*
*२०. संरक्षण संशोधन आणि विकास संघटन*

*२१.* *सीमा सडक विकास मंडळ, आणि*

*२२.* *राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे सचिवालय*

*२३.* *केंद्रीय अन्वेषण विभाग*

*२४.* *राष्ट्रीय अन्वेषण संस्था*

*२५.* *राष्ट्रीय गुप्तवार्ता ग्रिड (नॅशनल इंटेलिजन्स ग्रिड)*

*२६.* *लष्करी बल कमान (स्ट्रॅटेजिक फोर्सेस कमांड)*

**८. आवर्जून करण्याच्या आणि टाळण्याच्या काही बाबी**

- सुयोग्य उत्तर देण्यासाठी संबंधित माहिति अधिकाऱ्याला तुमची विनंती समजणे आवश्यक असल्यामुळे माहितीच्या अधिकाराचा अर्ज सादर करणे काही वेळा अवघड जाऊ शकते. माहिती अधिकाऱ्याला तुमची विनंती समजली नाही किंवा विशिष्ठ नमूना पाळता आला नाही (काही राज्य शासनांच्या परिस्थितीत असे होते), तर तुमचा अर्ज फेटाळला जाऊ शकतो.

- **अधिनियमाच्या कलम ६(२) अन्वये माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागताऱ्या अर्जदारासाठी अर्ज सादर करण्याची कारणे आणि उद्देश सांगणे गरजेचे नाही.** तसेच, हा कायदा अर्जदाराची माहिती मागत नाही. माहिती पुरवण्यासाठी आवश्यक असलेली अर्जदाराबाबतची केवळ किमान माहितीच आवश्यक असते. तांत्रिकदृष्ट्या, अधिनियमानुसार, माहिती पुरवण्यासाठी अर्जदाराला संपर्क साधण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेली अल्प, परंतु पुरेशी माहिती माहितीच्या अधिकाराखालील अर्जात देणे आवश्यक असते. ही तरतूद जागल्यांच्या (व्हिसलब्लोअर्स) हिताच्या दृष्टीने करण्यात आलेली आहे. तुमच्या मर्जीनुसार तुम्ही तुमच्या पत्त्याच्या ऐवजी पोस्ट बॉक्स नंबर देखील देऊ शकता.

- आपण आपला अर्ज योग्य त्या खात्यालाच संबोधित केलेला आहे अशी खबरदारी अर्जदाराने घेणे अत्यावश्यक आहे. माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम ६(३) अन्वये केलेल्या तरतुदींनुसार अर्ज एखाद्या वेगळया निकटचा संबंध असलेल्या विभागाशी संबंधित आहे असा विश्वास जन माहिती अधिकाऱ्यास वाटल्यास असा अर्ज तातडीने हस्तांतरित केला जाईल.

- माहिती अधिकाऱ्याचे नाव अर्जावर लिहू नये. आपण आपला अर्ज “जन माहिती अधिकारी, संबंधित खात्याचे नाव” असे लिहून संबोधित करू शकता. तुमचं अर्ज नजरचुकीने चुकीच्या जन माहिती अधिकाऱ्याला संबोधित करत असला तरीदेखील, माहितीचा अधिकार अधिनियमान्वये केलेल्या तरतुदींनुसार असा अर्ज तातडीने संबंधित खात्याकडे पाठवणे बंधनकारक आहे आणि या कारणासाठी अर्ज फेटाळता येणार नाही.

**९. तज्ञांच्या सूचना**

*माजी केंद्रीय माहिती आयुक्त शैलेश गांधी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम वापरणाऱ्या लोकांसाठी खालील सूचना केल्या आहेत व क्लूप्त्या सांगितल्या आहेत:-*

- सरकार त्याच्या अभिलेखात ज्या बाबी नोंदवेल अशा बाबींच्या संबंधातच आपण माहिती मागू शकतो हे धानात ठेवा. जो अभिलेखामध्ये ठेवता येणार नाही असा बोगस अर्ज माहितीच्या अधिकाराखाली करणे हा अर्जदार आणि संबंधित खाते दोन्हींसाठी देखील संसाधने आणि वेळेचा अपव्यय ठरेल.
- आपण मागू इच्छिता ती माहिती सोप्या शब्दात स्पष्ट करा. तुमच्या आवश्यकता मुद्देसूदपणे लिहा. त्यामुळे माहिती अधिकाऱ्यास सहज आकलन होईल. तुमचा अर्ज एखाद्या मित्राला दाखवून तुम्ही कोणती माहिती मागत आहात ते त्याला समजते काय हे पहाणे योग्य ठरेल.
- आपला माहितीच्या अधिकाराखालील अर्ज पूर्वीपासुन ज्ञात असलेल्या माहिती, सरकारी परिपत्रक, नियम, निर्बंध इत्यादिच्या आधारे माहिती मागवण्यासाठी असल्यास, संबंधित कागदपत्रे तुमच्या अर्जासोबत जोडा. त्यामुळे माहिती अधिकाऱ्याला तुमच्या अर्जाचा संदर्भ सुस्पष्ट होईल.
- शक्य असेल तेथवर, काय/ केव्हा/ कोठे अशा थेट प्रश्नांचा वापर तुमच्या अर्जात करणे टाळा. तुम्हाला असे करण्यापासून रोखणारा कोणताही नियम माहितीचा अधिकार कायद्यात नसला तरीदेखील अशा प्रश्नांमुळे अर्ज फेटाळल्याची उदाहरणे आहेत.
- आपण मागत असलेल्या माहितीच्या प्रती तुम्हाला हव्या आहेत की ती माहिती ईमेल द्वारे पाठवता येईल काय हे अर्जात स्पष्ट करणे आवश्यक नसले तरी तसे अर्जात लिहिणे योग्य ठरते.
- जिला प्रचंड म्हणता येईल अशा माहितीच्या प्रती मागू नका कारण त्यासाठी जन माहिती अधिकाऱ्याचा बराच वेळ खर्ची पडेल. त्यामुळे तो अशी माहिती देण्यास नकार देऊ शकतो. असे करण्यापेक्षा कागदपत्रांची तपासणी करण्याची मागणी करणे आणि अशी तपासणी करण्याची परवानगी मिळाल्यावर संबंधित कार्यालयात ठरलेल्या वेळी जाऊन तुमच्या संदर्भासाठी आवश्यक त्या पानाच्या प्रतीसाठी विनंती करणे अधिक श्रेयस्कर ठरेल.
- तुमचं अर्ज सादर केल्यावर, अपील दाखल करण्यापूर्वी तुमच्या अर्जाला उत्तर देण्यासाठी माहिती अधिकाऱ्यास ३५ दिवसांचा वेळ द्या.

**१०. माहितीच्या अधिकाराखाली माहिती मिळवण्यासाठी अर्ज लिहिण्यासाठी काही नमुने**

**स्थावर मालमत्तेच्या प्रकल्पाशी संबंधित माहिती मिळवताना:-**

अ) वरळी येथील महाकाली नाल्यालगतच्या सी फेस अपार्टमेंटच्या मान्य नकाशाची व मंजूर केलेल्या बांधकाम प्रस्तावाची प्रत मला द्यावी.

आ) बांधकामात नियमांचे उल्लंघन झाले असल्यास, आणि कारवाई सुरू केलेली असल्यास, ज्या पत्राद्वारे कारवाई सुरू केली आहे त्याची छायाप्रत मला द्यावी.

इ) हॅनकॉक फुलाच्या बांधकामाची माहिती मागताना अर्जासोबत त्यासंदर्भात केलेल्या कराराची प्रत आणि विनिर्देशांची छायाप्रत मला द्यावी.

**सभेच्या संदर्भात माहिती मिळवताना:-**

अ) दिनांक १५/०७/२०१९ रोजी आयोजित केलेल्या जाहीर सुनावणी/ ग्रामसभेच्या इतिवृत्ताची प्रत फाईलमधील नोंदी आणि अधिकाऱ्यांच्या टिपण्ण्यांसह मला द्यावी.

**रस्ते व्यवस्थापनाच्या संदर्भात माहिती मिळवताना:-**

अ) रस्त्यांच्या तपासणी आणि देखभालीसाठी प्रमाणे ठरलेली असल्यास, त्याच्या छायाप्रती आणि ते काम करण्याची जबाबदारी ज्यांच्यावर सोपवलेली आहे अशा अधिकाऱ्यांची पदनामे मला द्या.

आ) रस्त्यांच्या तपासणीच्या ________ ते ________ या कालावधीचे अहवाल असल्यास, त्या तपासणी अहवालांच्या प्रती मला द्याव्या.

**अतिक्रमणांच्या संदर्भात माहिती मिळवताना:-**

आपण आपल्या पत्र क्र सी/आरटीआय/१३६५ च्या "जोडपत्र ३" अन्वये तुमच्या मानखुर्द येथील १६.५ एकर जागेवरील रामजी टाक, मोहन गोयल आणि पॉप्युलर बिव्हरेजेस यांच्या अतिक्रमणाबाबत माहिती पुरवली आहे. या संदर्भात कृपया पुढील माहिती द्यावी:-

अ) अतिक्रमणे झाल्याच्या तारखा;

आ) अतिक्रमणे हटवण्यासाठी तुम्ही केलेल्या कारवाईचे तपशील.

**शासकीय प्रसासकीय प्रकल्पांबाबत माहिती मिळवताना:-**

अ) जयरथ, महाराष्ट्र शासनाच्या उद्योग खात्याचे सचिव आणि डाऊ केमिकल्स इंटरनॅशनल प्रा. लि. यांच्यात झालेल्या समझोता कराराची प्रत कृपया द्यावी.

आ) डाऊ केमिकल्सने सदर प्रकल्पासंदर्भात सादर केलेल्या आयईएम अहवालाची प्रत कृपया द्यावी.

इ) जयरथ, महाराष्ट्र शासनाच्या उद्योग खात्याचे सचिव आणि डाऊ केमिकल्स इंटरनॅशनल प्रा. लि. यांच्यात या प्रकल्पाविषयी झालेल्या समझोता कराराशी संबंधित असलेल्या अन्य सर्व पत्रव्यवहार आणि फाइल नोंदींच्या प्रती कृपया द्याव्यात.

**दफ्तर तपासणी करून माहिती मिळवण्यासाठी:-**

_____________ संदर्भातील फाइल्सची तपासणी करण्याची मला इच्छा आहे. याकामी मला मदत करण्यासाठी मी श्री _____________ यांना सोबत घेऊन येईल.

मी तपासणी करण्यासाठी सुयोग्य अशा दोन तारखा व वेळा कृपया कळवाव्यात. मला ज्यांच्या छायाप्रतींची आवश्यकता भासेल अशी कागदपत्रे तपासणी करत असताना मी निश्चित करेन.

*माहितीचा अधिकार अधिनियमाशी संबंधित बाबींवर अथवा तुमच्या माहितीच्या अधिकाराखालील अर्जासंदर्भात आपल्याला अधिक मार्गदर्शन हवे असल्यास गुगल किंवा ॲपल ॲप स्टोअरवरून मनिलाईफ फाउंडेशनचे आरटीआय ॲडव्हाईस ॲप डाउनलोड करा.*